महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १८७ वे | दिनांक : ०२/०७/२०२६ | वार : गुरुवार


## पावसाळी अधिवेशनात गदारोळ : १,४०० डॉक्टर नियुक्त्यांची घोषणा; शुल्कवाढ व रिक्त पदांवर विरोधक आक्रमक



**मुंबई** : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आजही अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवरून सभागृहात जोरदार चर्चा रंगली. राज्यातील विनापरवाना IVF केंद्रे, गर्भलिंग निदानातील गैरप्रकार, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील रिक्त पदे, पीकविमा, तसेच जळगाव सामूहिक बलात्कार प्रकरणातील जलद न्यायाच्या मागणीवरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले. आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी IVF गैरप्रकारांवर MCOCA लागू करण्यासाठी पुढील अधिवेशनात कायदेशीर तरतूद करण्याची घोषणा करत सरकारची भूमिका स्पष्ट केली.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदावर अखेर शिवसेना (शिंदे गट) नेते सचिन अहिर यांची बिनविरोध निवड झाली. महायुतीचे उमेदवार म्हणून त्यांनी अर्ज दाखल केला होता, तर महाविकास आघाडीकडून शिवसेना (ठाकरे गट)चे जगन्नाथ अभ्यंकर रिंगणात होते. मात्र, सभागृहाची परंपरा आणि सर्वानुमते निवड व्हावी, या भूमिकेतून महाविकास आघाडीने उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आवाजी मतदानाद्वारे सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली. या निवडणुकीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती आणि विरोधी पक्षातील सदस्य सभागृहात उपस्थित होते.

प्रश्नोत्तराच्या तासाने विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात झाली. यावेळी राज्यातील विनापरवाना IVF केंद्रांचा मुद्दा सभागृहात गाजला. परवान्याशिवाय सुरू असलेल्या IVF केंद्रांमुळे रुग्णांच्या जीवाशी खेळ होत असल्याची चिंता सदस्यांनी व्यक्त केली. यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी गर्भलिंग निदान, बेकायदेशीर सोनोग्राफी आणि IVF केंद्रांच्या माध्यमातून होणाऱ्या संघटित गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्यासाठी पुढील अधिवेशनात MCOCA लागू करण्याची कायदेशीर तरतूद करण्यात येणार असल्याची मोठी घोषणा केली. तसेच अशा गैरप्रकारांना कायमचा आळा घालण्यासाठी विद्यमान कायदे अधिक कठोर करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील रिक्त पदे, अपूर्ण आरोग्य प्रकल्प आणि कोरोना काळातील आशा स्वयंसेविका व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या थकीत देयकांचा मुद्दा उपस्थित करत सरकारला धारेवर धरले. दुसरीकडे, काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी जळगाव सामूहिक बलात्कार प्रकरणाचा मुद्दा उपस्थित करत नसरापूर प्रकरणाप्रमाणेच महिलांवरील अत्याचाराच्या सर्व गंभीर गुन्ह्यांचा फास्ट ट्रॅक न्यायालयात जलद निकाल लावण्याची मागणी केली.

यवतमाळचे काँग्रेस आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी पीकविमा प्रश्नावर विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करून शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.

चेंबूरमध्ये शाळेच्या वाहनावर झाड कोसळून विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा मुद्दा आज विधानसभेत उपस्थित करण्यात आला. या दुर्घटनेप्रकरणी संबंधित मुंबई महापालिका अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा जबाबदार असल्याचा आरोप करत आमदार तुकाराम काते यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

## “खरी शिवसेना शिंदेंकडेच” आठवलेंचा टोला



**मुंबई** : उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला धक्का देत विधान परिषदेचे नवनिर्वाचित उपसभापती सचिन अहिर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे हेच बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत असल्याचे सांगत त्यांनी सचिन अहिर यांच्या निर्णयाचे समर्थन केले.

रामदास आठवले म्हणाले, "ही बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आहे. उद्धव ठाकरे हे बाळासाहेबांच्या नेतृत्वाखाली पुढे आले. मात्र, एकनाथ शिंदे यांनी तळागाळात उद्धव ठाकरेंपेक्षाही अधिक काम केले आहे. ठाण्यात शिवसेना वाढवण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे शिवसेना त्यांची नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही."

सचिन अहिर यांच्या पक्षप्रवेशाबाबत बोलताना रामदास आठवले म्हणाले की, "सचिन अहिर महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री राहिले आहेत. ते वरळी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. त्यानंतर त्यांना आदित्य ठाकरे यांच्या विजयासाठी शिवसेनेत आणण्यात आले होते." ते पुढे म्हणाले, "आज त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामागे त्यांची कारणे योग्य आहेत."

रामदास आठवले यांनी पुढे दावा केला की, "सचिन अहिर यांचे मत आहे की एकनाथ शिंदे यांचाच पक्ष खरी शिवसेना आहे. कारण धनुष्यबाण हे पक्षचिन्ह, शिवसेना हे नाव आणि बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा त्यांच्याकडे आहे. त्यामुळेच त्यांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला."

सचिन अहिर यांनी नुकताच ठाकरे गटाला रामराम करत शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांची विधान परिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. या घडामोडीनंतर विशेषतः मुंबईतील शिवसेनेच्या राजकारणात आणि वरळी मतदारसंघाच्या भविष्यातील समीकरणांबाबत चर्चांना वेग आला आहे. दरम्यान, रामदास आठवले यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे आणि शिंदे गटातील राजकीय वादाला आणखी धार मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## केतन अग्रवाल प्रकरणी दंतवैद्य मुस्कान सोनी निलंबित



**पुणे** : पुण्यातील व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्येची सोशल मीडियावर खिल्ली उडवल्याचा आरोप झालेल्या मध्य प्रदेशातील दंतवैद्य मुस्कान सोनी हिच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. ऑल इंडिया डेंटल स्टुडंट्स अँड सर्जन्स असोसिएशन (AIDSA) ने मुस्कान सोनीला संघटनेतून पाच वर्षांसाठी निलंबित केले आहे. केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणावर आक्षेपार्ह टिप्पणी करतानाचा मुस्कान सोनीचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर तिच्यावर सर्व स्तरातून तीव्र टीका झाली होती. व्हिडिओमध्ये मुस्कान सोनी हिने केतन अग्रवाल यांचे 'विग'वरून वादग्रस्त विधान केले होते. यामुळे तिच्यावर सर्वच स्तरातून टीका होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर AIDSA ने तिच्यावर पाच वर्षांसाठी निलंबनाची कारवाई केली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मुस्कान सोनी हिने केतन अग्रवाल यांच्या हत्येची खिल्ली उडवल्याचा आरोप करण्यात आला. या व्हिडिओमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. सोशल मीडियावरही तिच्याविरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात येत होती. ऑल इंडिया डेंटल स्टुडंट्स अँड सर्जन्स असोसिएशनने (AIDSA) डॉ. मुस्कान सोनी यांना AIDSA च्या सर्व पदांवरून आणि सदस्यत्वावरून निलंबित केले आहे. "डॉ. मुस्कान सोनी यांनी AIDSA च्या घटनेचे, आचारसंहितेचे आणि नैतिक मूल्यांचे उल्लंघन करून, गैरशिस्तीचे कृत्य केले असून दिवंगत केतन अग्रवाल यांच्याबद्दल अत्यंत अनुचित, आक्षेपार्ह आणि अनादरपूर्ण टिप्पणी केल्याचे आढळून आले आहे... सक्षम प्राधिकरणाने यात बदल किंवा रद्द करेपर्यंत, हे निलंबन जारी झाल्याच्या तारखेपासून पाच (०५) वर्षांसाठी प्रभावी राहील. हा आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येत आहे," असे निलंबन आदेशात म्हटले आहे.

या निर्णयामुळे वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांनी सार्वजनिक व्यासपीठावर जबाबदारीने वागण्याची




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०२ जुलै २०२६



१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# श्रीकृष्ण महाविद्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन




**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आज वसंतराव नाईक यांची वृक्षारोपण करून जयंती साजरी करण्यात आली. वृक्षारोपण करून अनोखे अभिवादन करण्यातच महान विचारवंताच्या विचारांचा अंगीकार केल्यासारखे होते. त्यातच खरी मानवता आहे. याची प्रचिती देणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष सांगताना म्हणाले की, वसंतराव नाईक यांनी कृषी औद्योगिक क्षेत्रात अमुलाग्र अशी कामगिरी केली. ते हाडाचे प्रगतिशील शेतकरी होते ,याशिवाय शेती आणि मातीवर त्यांची निस्सिम निष्ठा होती .आपले संपूर्ण आयुष्य शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी झिजवले. अनेक शेतकरीहिताचे क्रांतिकारी निर्णय त्यांनी आपल्या कार्यकाळात घेतले. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा सन्मान म्हणून एक जुलै ही त्यांची जयंती, कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय 1989 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घेतला .तेव्हापासून शासकीय कार्यालयात आणि सर्वत्रपणे कृषी दिन साजरा केला जातो .वसंतराव नाईक यांच्याकडे आधुनिक कृषीसंत व त्याचबरोबर शेतकऱ्यांचे भाग्यविधाते म्हणूनच पाहिल्या जाते .कार्यालयाबरोबरच थेट शेती शिवारात त्यांची जयंती साजरी होत असलेले वसंतराव नाईक हे देशातील एकमेव उदाहरण आहे .वसंतराव नाईक यांनी भारतीय कृषी क्षेत्रात अमुलाग्र क्रांती घडवून आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. ते भारतीय कृषी संशोधन परिषदांचे अर्थस्थायी समितीचे सदस्यही होते. त्यांच्या जयंतीनिमित्त कृषी विभागाद्वारे कृषी संजीवन सप्ताह साजरा केला जातो .थेट शेत बांधावर शेतकऱ्यांना कृषी विषयक मार्गदर्शन केल्या जाते. तसेच सामाजिक क्षेत्रातील संस्थाद्वारा थेट बांधावर शेतकरी कृतज्ञता सप्ताह म्हणून सुद्धा साजरा करत ,या दृष्ट्या नायकाला अभिवादन केले जाते. असे सांगून आजही वसंतराव नाईक यांचे कृषिविषयक धोरण उपयुक्त ठरत आहे असे प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड,प्रा.डॉ.योगीराज विजापुरे आणि मा. सिद्रामप्पा देशमुख उपस्थित होते. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसमवेत अनेक वृक्षांची लागवड करत सामूहिक वृक्षारोपण करत वसंतराव नाईक अभिवादन करण्यात आले.

# तिसगाव आश्रम शाळेत मुख्याध्यापक विलासजी कटारे यांचा सेवानिवृत्ती सत्कार उत्साहात



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** तालुक्यातील तिसगाव येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगावचे मुख्याध्यापक श्री. विलासजी कटारे यांच्या प्रदीर्घ, समर्पित व उल्लेखनीय शैक्षणिक सेवेला मानाचा मुजरा म्हणून त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दिपप्रज्वलन ,अभिवादन करून केली या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती श्री विलासजी कटारे व त्यांच्या पत्नी श्रीमती साधना कटारे, मुलगा अडव्होकेट समीर कटारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती दिपाली खेडकर व अध्यक्षीय भाषण विद्यमान मुख्याध्यापक श्री डिगांबर खालापुरे यांनी केले. विलासजी कटारे सर आम्हाला सोडून जाणार हे विद्यार्थी व विद्यार्थिनींना कळताच त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ह्या वर्षीचा पाऊस इथे परिसरात पडलाच नव्हता पण हे मायेचं वटवृक्ष येथून जाणार हे कळताच ढगांना सुद्धा अश्रू अनावर झाले आणी जोरदार पाऊस बरसला.या प्रसंगी उपस्थित मान्यवर, शाळेचे शिक्षक श्री भागवत डोंगरे, श्री योगेश ठाकुर, श्री दिनेश परदेशी, श्री पंढरीनाथ धोंडकर, श्री भरत भावसार, श्री धम्मपाल सोनकांबळे, श्रीमती वैशाली केकाण, संजय मधे, श्री रामेश्वर राठोड, श्रीमती नफीसा सैय्यद, श्री नारायण सोनवणे, माजी क्लार्क श्री मनोज शिंदे कला शिक्षक लखन राठोड शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. तसेच शाळेच्या वसतिगृहाचे गृहपाल श्रीहरी कांगणे, स्वयंपाकी सुनिता माळी, नारायण कर्पे, चौकीदार वैभव खिलारे, बाबासाहेब विधाते, शाळा व्यवस्थापन समिती पालक सदस्य सनिराम गावंडे आणि भागिनाथ घुसाळे मामा, अनिल कर्पे व समाधान घुसळे ग्रामपंचायत सदस्य कार्यालय तिसगाव व ग्रामस्थ यांनी श्री.कटारे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोलाच्या योगदानाचा गौरव केला. आपल्या सेवाकाळात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने परिश्रम घेतले. त्यांच्या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ आणि विद्यार्थीहित जपणाऱ्या कार्याचा अनेक वक्त्यांनी गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख केला. समारंभात श्री. विलासजी कटारे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह, सेवा समाप्ती सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षक, कर्मचारी व मान्यवरांनी त्यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, सुख, समृद्धी आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.उत्तरपर भाषणात श्री. कटारे यांनी आपल्या १४ आगस्ट २००६ पासून ते ३० जून २०२६ या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सहकारी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि सर्व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करत राहावे, एकमेकांना समजून कार्य करत रहा असा संदेशही दिला. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी,भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. आभार प्रदर्शन श्रीमती मनिषा सानप यांनी केले या आभार प्रदर्शनात उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि हजेरी पटावर शेवटची सही करुन श्री. विलासजी कटारे यांनी श्री डिगांबर खालापुरे यांच्याकडे पदभार सुपूर्द करून सेवा निवृत्तीचा निरोप घेतला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०२ जुलै २०२६


# केसरजवळगा येथील मुख्याध्यापक दत्तात्रय कुलकर्णी यांना भावपूर्ण निरोप



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील महात्मा गांधी विद्या मंदिराचे मुख्याध्यापक दत्तात्रय कुलकर्णी यांचा मंगळवारी (ता. ३०) रोजी सेवापूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात व भावपूर्ण वातावरणात पार पडला. शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होताना कुलकर्णी यांनी मांडलेला जीवनाचा लेखाजोखा उपस्थितांना भावूक करणारा ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक श्रीमंत भुरे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विष्णू पाटील, संगमेश्वर घाळे, बाबासाहेब डांगे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी दत्तात्रय कुलकर्णी व सौ. सुचिता कुलकर्णी यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना दत्तात्रय कुलकर्णी म्हणाले की, शैक्षणिक प्रवासात मिळालेले प्रेम आणि सहकाऱ्यांची साथ हीच माझ्या आयुष्याची खरी पुंजी आहे. त्यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळातील आठवणींना उजाळा देत सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. संजय कोथळीकर आणि लक्ष्मण देवकर यांनी आपल्या मनोगतातून कुलकर्णी यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोप करताना श्रीमंत भुरे यांनी कुलकर्णी यांच्या निष्ठावान सेवेचा गौरव केला. याप्रसंगी सरपंच पूजाताई पटवारी, ग्रामविकास अधिकारी गंगाराम इंगळे, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र कोरे, तुळजापूर पं. स. च्या उपसभापती रोहिणी निलगिरे, उद्योजक भीमसिंग राजपूत, फारुक शेख, आण्णा पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, मित्रपरिवार आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय बणजगोळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश भुरे तर आभार योगेश कोडलंगरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकेश बिराजदार, अँड. एस. पी. इनामदार व विद्यालयातील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील वाटचालीस सर्वांनी कुलकर्णी यांना शुभेच्छा दिल्या.

## ज्ञानेश्वर विद्यालयात हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयात हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व अर्थमंत्री वसंतरावजी नाईक यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाच्या कैलासवासी पंढरीनाथ पाटील उर्फ भाऊ सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ.संध्या मोरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक संभाजी तांगडे हे होते.*प्रतिमा पूजनाने सुरुवात*कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून व त्यांना अभिवादन करून झाली.*जीवनपटावर प्रकाश*याप्रसंगी बोलताना डॉक्टर रवींद्र साठे यांनी विद्यार्थ्यांना वसंतरावजी नाईक यांच्या प्रेरक जीवनपटाविषयी सविस्तर माहिती दिली. नाईक यांनी कृषी क्षेत्रात घडवून आणलेली हरितक्रांती आणि त्यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान त्यांनी अत्यंत सोप्या आणि अभ्यासपूर्ण भाषेत विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवले.*उपस्थिती व आभार*कार्यक्रमाच्या शेवटी भरत झोडपे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि त्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल मध्ये कृषी दिन साजरा करण्यात आला




**छत्रपती संभाजीनगर :** श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल भारतमाता नगर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर येथे स्वर्गीय माजी. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष आदरणीय श्री दादासाहेब पाटील, होते.प्रमुख म्हणून श्री तिरुपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री किरण पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री गावंडे सर तसेच श्रीमती अनुराधा देशमुख मॅडम , श्रीमती विजया दारुंटे मॅडम तर, ज्येष्ठ शिक्षक संभाजी भोसले सर व श्रीमती पुष्पा पवार मॅडम यांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, श्री शिंदे सर, मनगटे सर, जुबंडे सर, गायकवाड सर, पडवाल सर, धनवे सर, विद्यार्थी आरुष चव्हाण , आदर्श पवार यांनी भाषण केले.सूत्रसंचालक श्री सचिन घुले सर यांनी केले. आभार प्रदर्शन श्री खैरे डी व्ही यांनी केले. या प्रसंगी शाळेचे इतर कर्मचारी बोडखे व जाधव मावशी आणि पालक उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०२ जुलै २०२६

## पाऊस आला

आला आला पाउस आला
बाहेर जायचे आता गुपचूप
अंगणातील गारा वेचूनी
खेळायचे आता खूप खूप

आला आला पाउस आला
कागदाची सोडूया आता होडी
खळखळणाऱ्या पाण्याची
गंमत पाहूया थोडी

आला आला पाउस आला
मातीचा दरवळतो गंध
फुलाफुलातूनी टिपती
फुलपाखरं मकरंद

आला आला पाउस आला
पक्ष्यांचे भिजले अंग
नभाकडे डोकावून पाहता
इंद्रधनुचे खुलले सप्तरंग

आला आला पाउस आला
अंगाला झोंबतो गार वारा
विजांचे नृत्य चालू असता
नभी गर्जतो ढगांचा नगारा



**- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६**

## झाली गर्भार हो माती

पहिल्याच पावसाने,
शेती भिजवून जातो.
आनंदाने बळीराजा,
पेरणीचे गीत गातो.

शेती पेरणी करता,
बीज मातीत रुजले.
रिमझिम पावसात,
बीज शेतात निजले.

बीज निजता मातीत,
झाली गर्भार हो माती.
काळया मातीशी बियाणे,
असे जुळविले नाती.

नाती जुळता मातीशी,
कोंब टरारुन आले.
कोंब टरारून येता,
मन आनंदित झाले.

पीक फुलता शेतात,
मनी उत्साह वाढला.
आनंदाने बळीराजा,
पीक सोंगुनी काढला.



**- नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**

## राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणाची दारे गोरगरिबांसाठी खुली केली- डॉ. आत्माराम झिंजुर्डे



**शिरूर कासार :** छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन मानून सर्वसामान्य,वंचित व मागास घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.असे प्रतिपादन कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कालिकादेवी कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांची प्रमुख उपस्थित होती.तर व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.अशोक घोळवे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक प्रीती विधाते कर्मचारी सचिव डॉ.नवनाथ पवळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.आत्माराम झिंजुर्डे म्हणाले की,छत्रपती शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला तसेच वसतिगृहे,शिष्यवृत्ती आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांद्वारे दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले.जातीय भेदभाव दूर करून समता,बंधुता आणि सामाजिक न्यायाची मूल्ये रुजविण्यात त्यांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.आजच्या पिढीने शाहू महाराजांच्या विचारांचा आदर्श स्वीकारून शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करावे,असे आवाहन त्यांनी शेवटी केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे म्हणाले की,शाहू महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजही ते समाजासाठी प्रेरणादायी आहे.शिक्षण,समता,सामाजिक न्याय आणि मानवतावादी मूल्यांचा वारसा जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा,असा सल्लाही त्यांनी शेवटी विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अशोक घोळवे यांनी केले.तर उपस्थित मान्यवरांच्या आभार प्रा.प्रिती विधाते मॅडम यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

## आरोग्य विज्ञान विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी



**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, डॉ. देवेंद्र पाटील यांनी अभिवादन केले. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी, अॅड. संदीप कुलकर्णी, श्री. संदीप राठोड, श्रीमती योगीता पाटील, श्री. प्रशांत पवार, श्री. अजांबर गावंडे, श्री. सचिन बोरसे, श्री. नाना परभणे, श्री. प्रल्हाद सेलमोकर, श्री. विजय सोनवणे, श्री. पुष्कर तऱ्हाळ, श्री. कृष्णा भवर, श्री. गोपाल जारवाल, श्री. विजय कुरकुरे, श्री. नंदन वाघ, श्री. आबाजी शिंदे, श्री. जितेंद्र शिरसाठ, श्री. रोशन चक्रवर्ती, श्री. अनंता शिंदे, कु. अनुषा वेमुला, श्रीमती सारीका वाघ, श्री. शांताराम गुंजाळ, श्री. दिलीप राजपूत आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार ०२ जुलै २०२६


# बोलींना चिडवण्याची भाषा - डॉ. सुधीर रा. देवरे

भाषेसंदर्भात एका चुकीच्या अवतरणावर नाईलाजानं मला व्यक्त व्हावं लागलं. पण त्या अवतरणाची बाजू घेऊन (केवळ) प्रमाणभाषा प्रेमी असलेली आणि ते अवतरण प्रसारीत करणारी एक व्यक्ती माझ्याशी वाद घालू लागली. तो सर्व विसंवाद मुद्दाम साक्षेपी खाली देत आहे. मला न कळत माझी अचानक घेतलेली ही उध्दट मुलाखतही म्हणता येईल :

२७ फेब्रुवारी २०२३ ला कोणाचंही नाव नसलेलं खालील एक अवतरण समाज माध्यमांवर फिरू लागलं. तेच अवतरण एका बऱ्या वाचक व्हॉटसअप ग्रुपवर पुण्याच्या एका प्रमाणभाषा समर्थक वाचकानं टाकलं. ते मूळ अवतरण असं : ''न आणि ण,श आणि ष,ळ आणि ड,चांदणीमधील च आणि चंद्रमधील च जहाजमधील ज आणि जीवनमधील जयांच्या उच्चारातील फरक कळणाऱ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! बाकीच्यांणा मराठी भाशा दिणाच्या मणापासूण षुभेच्छा!!!'' या फॉरवर्डेड पोस्टवर न राहवून मला लिहावं लागलं : 'मला वाटतं सोनाली कुलकर्णी (ज्युनिअर) यांनी फेसबुकवर अशी पोस्ट टाकली होती. (चुकभूल देणं- घेणं.) ज्यानं कोणी असा मूळ (अ)विचार मांडला त्याचा हा तथाकथित शहाणपणा आहे. फक्त प्रमाणभाषा शुध्द आणि बहुजनांच्या बाकी भाषा- बोलीभाषा अशुद्ध. असा शुध्द-अशुध्दपणा अधोरेखित करण्याचा हा अतिशहाणा खोडसाळ प्रयत्न आहे. महाराष्ट्रात अंदाजे १०० बोलीभाषा बोलल्या जातात आणि त्यांत वरीलप्रमाणेच बरेचसे उच्चार होतात. म्हणजे वरचं अवतरण लिहिणाऱ्यानं असे उच्चार करणाऱ्या ग्रामीण लोकांचा उपहास केला आहे. असेच पण थोड्याफार बदलाचे उच्चार महाराष्ट्रातील सर्व बोलीभाषक आपल्या सहज नैसर्गिक भाषेत करत असतात. आपल्या मातृभाषेतले असे उच्चार करण्यात त्यांना अजिबात कमीपणा वाटायला नको म्हणून हा निरसन प्रपंच. वरील अवतरण वाचून तमाम बोलीभाषक बंधुंनी आपल्या मनात कोणताही न्यूनगंड न बाळगता आपण आपली बोली जशी वापरतो, जशी बोलतो, तशीच ती मायबोली सहज बोलत रहावी. आपण तसं केलं तरच ही प्रमाणभाषा म्हणजे मराठी भाषा टिकेल आणि ती पुढं अधिक कसदार- बळकट- प्रवाही होत राहील...' मी व्यक्त होताच ग्रुपवर फॉरवर्ड करणाऱ्या व्यक्तींनं पुन्हा युक्तीवाद केला. त्या व्यक्तीनं तात्काळ माझ्या विरोधात लिहिलं : ''बोलीभाषांना बोली म्हणूनच प्रेम मिळेल- प्रमाण भाषा ही अचूक संप्रेषणासाठी आवश्यक आहे. हा तथाकथित नव्हे- खरोखरचा शहाणपणा आहे. खानदेशीत कोणी 'मन वढाळ वढाळ' लिहिलं तर तुम्ही तिला खानदेशी म्हणाल का? असो. हे वाद पुरातन आहेत- आज कशाला उकरून काढायचे?'' माझं उत्तर : 'बोलीभाषांना बोली म्हणूनच प्रेम मिळेल म्हणजे काय? असं प्रेम देऊन वा सहानुभूती दाखवून कोणी तथाकथित प्रमाणभाषक बोलीवर उपकार करणार आहेत का? सगळ्या बोलीसुध्दा अचूक संप्रेषणच करतात- अचूक संवाद साधतात. म्हणून तर त्या आदिम काळापासून जिवंत आहेत. 'मन वढाय वढाय'च म्हटलं पाहिजे हे तुम्ही कबूल करता. म्हणजेच बोली महत्वाच्या ठरतात आणि त्यांचे उच्चारही त्यांच्या नैसर्गिक हेलसह जसे आहेत तसेच ठेवले पाहिजेत. मराठी प्रमाणभाषा (वा कोणतीही प्रमाणभाषा) ही बोलींच्या पायावर उभी असते. (प्रमाणभाषा ही आजूबाजूला बोलल्या जाणाऱ्या अनेक बोलींच्या शब्द बळावर तयार झालेली कृत्रिम पण रूळलेली भाषा असते.) आपण म्हणता तसं आजही भाषेत सोवळंओवळं पाळलं- बोलींना हलक्यात घेतलं तर मराठीही संस्कृतसारखी लवकरच मृत भाषा होईल.' ग्रुपवर पोस्ट फॉरवर्ड करणारी व्यक्ती : ''बरं! मग काय म्हणू? मरण टाळण्यासाठी काहीही! विद्वान सर्वत्र ० ते!'' मी : 'ही टिपणी अशोभनीय आहे. पण मी आपल्याला तशाच वाईट भाषेत उत्तर देणार नाही. शेतकऱ्यांना ग्रामीण भागात उच्चार शिकवायला तथाकथित उच्च भाषा बोलणारे लोक येतील का? आणि आले तरी त्यांनी ती का शिकावी? अथवा आपण ग्रामीण भागात जन्माला आला असता तर आपली हीच भूमिका असती का? ह्या संदर्भात उलट उत्तर असेही देता येईल... तथाकथित विद्वान फक्त पुण्यात ० ते!' तिसरी व्यक्ती : ''सर, महाराष्ट्रातील लोकांकरता हा वाद ठीक. पण परकियांना जेव्हा मराठी शिकायची असते तेव्हा ती प्रमाण असायला हवी. आपण प्रमाण इंग्रजी शिकतो. इंग्लडमध्ये प्रांतवार भाषा नसेल का? बोली भाषा प्रमाण भाषेला समृद्ध करते. वरील वाद न संपणारा आहे. मी खेड्यातून आलोय.'' मी : 'आपलं म्हणणं विशिष्ट संदर्भात बरोबर आहे. पण वर दिलेल्या त्या विशिष्ट टिपणीत बोलीभाषा बोलणाऱ्यांची स्पष्ट हेटाळणी केलेली आहे. म्हणून मी केवळ मराठी भाषेसाठी प्रतिक्रिया दिली. सामायिक भाषा बोलीकांनी बोलींकडं उदार दृष्टीनं पहायला शिकावं.' ग्रुपवर पोस्ट फॉरवर्ड करणारी व्यक्ती : ''का बरं? अशुद्ध सर्वच चालवून घ्यावं लागेल! असे अनर्थ तुम्हाला मान्यच झाले पाहिजेत. माझा मुद्दा आपोआप सिद्ध झाला बघा! तेवढाच मुद्दा होता! होय- शिकायला कष्ट का करू नयेत? बोलींची गोष्ट वेगळी. पण तुमच्या भूमिकेवरून चाललो तर मराठी मरणाआधीच मरेल! ज्ञानभाषा तर होणारच नाही- कारण तिला नेमकेपणाच नसेल.'' मी : 'काय सिध्द झालं आणि कसं? मुळी भाषेत शुध्द अशुध्द असं काही नसतंच. मराठी ही ज्ञानभाषा आजच आहे... बोलीच्या बोलीकांनी प्रमाणभाषा का शिकावी? त्यांची बोली ही त्या त्या ठिकाणी प्रमाणभाषाच आहे! तुम्ही बोली का शिकत नाहीत मग? कारण तुम्हाला त्याची आवश्यकता वाटत नाही. ग्रामीणांनाही म्हणूनच प्रमाणभाषा शिकायची गरज नाही. ग्रामीण लोक बोलतात ती बोली, त्या त्या लोकजीवनाची- लोकसंस्कृतीची- परिवेशातली नैसर्गिक भाषा असते. बोलींच्या पायावर प्रमाणभाषा उभ्या राहतात. बोली आहेत म्हणून प्रमाणभाषा आहे. बोली वगळल्या तर प्रमाण मराठी मरायला वेळ लागणार नाही.' ग्रुपवर पोस्ट फॉरवर्ड करणारी व्यक्ती : ''पुणे / मुंबई वगैरेचा प्रश्न नाही. मी संपादक आहे. नियतकालिक दोन्ही शहरातून चालवलं. शुद्धलेखनासाठी अपार कष्ट घेतले. इतर अनेक नियतकालिकांनीही. इथं अशुद्ध छापून येऊ देत का तुमचे लेख? तुम्हाला चालेल- वाचकांना चालणार नाही. बोली भाषेतले शब्दही नेमकेच लिहावे लागतील हा मुद्दा नाही पटला का? नियतकालिकामधे ग्रामीण लेखकांचे बोलीशब्द तसेच ठेवतो. लई ब्येसचं फार चांगलं करत नाही. पण ते काय लिहिलंय ते कळायला तर हवं ना? 'ळफी केस' लिहून काय कळणार केस काय आहे ती!'' मी : 'ळफी केस म्हणजे काय? आपल्याला नक्की काय म्हणायचं ते नीट कळलं नाही. पण तरीही मुद्दा स्पष्ट करतो. समजा मी माझ्या अहिराणी भाषेतल्या लेखात वाक्य लिहिलं, 'पानी पी घिदं आनि बसनू मंग घरमा जरासा.' हे वाक्य आपण जसंच्या तसं छापलं तरच ते योग्य राहील. पण तुम्ही शुध्द करण्याच्या तथाकथित प्रयत्नात (प्रुफ रिडींग करताना) हे वाक्य जर पुढील प्रमाणं दुरूस्त केलं, 'पाणी पी घिदं आणि बसनू मंग घरमा जरासा.' तर हे तुम्ही दुरूस्त केलेलं वाक्य चुकीचं होईल. कारण अहिराणीत 'ण' नाहीच, 'न' वापरतात. मराठीत 'ण' वापरतात, म्हणून अहिराणीतही वापरावा असा आपला आग्रह दिसतो. हिंदी भाषेत जसा 'ण' नाही तसा अहिराणीतही 'ण' नाही. तीच बाब 'ष' ची. म्हणून अहिराणीत 'भाषा' हा शब्द लिहिताना 'भाशा' असं लिहिलं तर ते अहिराणीत (तुमच्या म्हणण्याप्रमाणे) शुध्द राहणार आहे. वरील ज्या टिपणीवर आपली चर्चा सुरू आहे, त्या टिपणीत हा मुख्य घोळ आहे. त्या टिपणीत-टिपणी लिहिणाऱ्यानं तथाकथित सुशिक्षितपणा दाखवण्यासाठी भाषाशास्त्रच निकालात काढलं आहे. (भाषेत शुध्द-अशुध्द संकल्पना नाहीत, पण आपण तो शब्द पुन्हा पुन्हा वापरत आहात, त्या स्पष्टीकरणासाठी मला आपल्या 'शुध्द-अशुध्द' संकल्पनेत हे लिहावं लागलं.)'

ग्रुपवर पोस्ट फॉरवर्ड करणारी व्यक्ती : ''मग ज्ञानभाषेत भोंगळ शब्दकळा चालणारच नाही. शैली या शब्दाला काही अर्थच राहणार नाही, वाटेल तसं लिहिलं तर. भाषेच्या सौंदर्याला का मुकायचं अशुद्धाच्या हव्यासापायी? हाही एक उपहासच- नव्हे, विटंबना जाणूनबुजून केलेली. माझी टिपणी तुम्हाला खटकली, तिथेच प्रमाणभाषा जिंकली! असो. जो जे वांच्छील तो ते लिहो... पण जो जसे लिहील तसे सर्वांनी चालवून घ्यावे ही मात्र अनर्थकारक भूमिका आहे.'' मी : 'भोंगळ शब्दकळा वेगळी आणि बोलीभाषा वेगळी. बोली भाषेलाही स्वयंभू शैली आहे- स्वयंभू शब्द आहेत. वाटेल तसं लिहिणं म्हणजे चांगलं लिहिणं असं कोणी आणि केव्हा सांगितलं? कोणत्याच बोली भाषेत वाटेल तसं बोलणं वा लिहिणं नाहीच मुळी. भाषेच्या सौंदर्याला मुकायचं नसेल तर कोणत्याही भाषेकडं डोळसपणे आणि उदार दृष्टीनं पाहिलं पाहिजे. तिरस्कृत पध्दतीनं व्यक्त होऊन नाही. पुज्यतेला आपण शून्यात गणलं म्हणून खटकलं. प्रमाणभाषेच्या विरूध्द मी केव्हाच लिहिलं नाही. माझी मराठी- प्रमाणभाषा तर जिंकलीच पाहिजे. प्रमाणभाषा हरावी असं माझं म्हणणं आहे हे तुम्ही कसं काय ठरवता? (मराठीच नव्हे तर इंग्रजी, हिंदी आणि उर्दूही जिंकावी. कोणत्याही भाषेचा व्देष नको.) पण माझ्या प्रमाणभाषेतल्या अनेक नैसर्गिक बोलींवर जर कोणी हेटाळणीनं बोलेल, तर ते मी मुकाट्यानं खपवून घेणार नाही. जगातल्या कोणत्याच भाषेवरची टीका मी सहन करू शकत नाही. जगातल्या सगळ्याच बोलींचा- भाषांचा आपण आदर केला पाहिजे व त्यांच्यातलं सौंदर्य समजून घेतलं पाहिजे. आजच्या सर्व बोली या भाषाच आहेत, असं आजचं जागतिक भाषाशास्त्र सांगतं.' ग्रुपवर पोस्ट फॉरवर्ड करणारी व्यक्ती : ''मी खेड्यात गेले तर बोलताना त्यांना समजेलशा शब्दांतच बोलते- त्यांचा हेल काढून बोलते. तामिळनाडूत इंग्रजी बोलताना त्यांचे उच्चार / हेल वापरते. कारण कम्युनिकेशनसाठी ते आवश्यक आहे. त्यात हसण्यासारखं काही नाही.'' मी : 'बरोबर. आपल्या या भूमिकेचं स्वागत करतो. देवेगौडा पंतप्रधान होते, तेव्हा ते संसदेत कन्नड टोनमध्ये इंग्रजी बोलायचे. माझ्या इंग्रजी वा मराठी बोलण्यातही अहिराणी टोन असतो. आणि हे सर्व साहजिक असल्याचं आजचं भाषाशास्त्र सांगतं. टोन बदलला म्हणजेच भाषेचे उच्चार बदलतात. लेखाच्या सुरूवातीला दिलेलं ते विशिष्ट अवतरण म्हणजे आपण स्वतः उच्च आणि इतरांना कमी समजण्याची मानसिकता आहे. आज जातीवरून कोणाला उघडपणं चिडवता येत नाही, म्हणून काही लोक आता भाषेवरून चिडवू लागलीत की काय, अशी या अवतरणावरून शंका येते.' या नंतर सदर व्यक्तीचे युक्तीवाद आले नाहीत. भाषा कोणतीही असो, ती माणसाला जोडण्यासाठी आहे. संवादासाठी असते. तसेच कोणाला कळू नये म्हणून ती कृत्रिमपणे तयार होत नाही. आपल्या लोकसंस्कृतीचा परिवेश ती अनायासे उपयोजित करत असते. (आपल्या वर्तुळातच समजाव्या म्हणून काही मानवी गटात कृत्रिम भाषाही तयार केल्या जातात. पण अशा भाषा या भाषा नसतात आणि बोलीही नसतात.) एका गावापासून तर चार-चार जिल्ह्यात पाय पसरून बोलली जाते, ती त्या परिवेशाची बोली. एका गावात आणि एकच भाषा बोलणारे लोकसुद्धा आपापली खास भाषा बोलत असतात. एक म्हणतो, माझी भाषा शुद्ध आहे, दुसरा म्हणतो, माझी भाषा शुद्ध. असं म्हणणारे आपलं स्वतःचं अशुध्दपण जगजाहीर करत असतात. खरं तर भाषा ही भाषा असते. भाषेत शुद्ध आणि अशुद्ध असं काही नसतं. आपल्या दृष्टीनं कोणी चुकीची भाषा बोलत असेल तर ती भाषा 'चुकीची' नसून त्या व्यक्तीची ती 'खास' भाषा असते. म्हणूनच भाषेबाबत 'अस्सल' आणि 'कम-अस्सल' असं काही नसतं. कोणाच्याही भाषेला शरण जात आपण स्वतःच वेळोवेळी स्वतःला शुद्ध करून घ्यावं. म्हणजे कोणाच्या भाषेला 'नावं ठेवणं' व आपल्या भाषेला आपणच 'शुद्ध म्हणणं' आपल्या वाणीतून त्याज्य ठरेल. दोन व्यक्तीत वा दोन भिन्न भाषांत मैत्रीपूर्ण संवाद पूर्ण झाला की भाषा जिवंत होत जातात. ताजा कलम : वरील साक्षेपी निरसन लिहून झाल्यानंतर विविध भाषणात उल्लेखित प्रेमानंद गज्वी व भालचंद्र नेमाडे यांचे उद्गार समाजमाध्यमातून उपलब्ध झाले, ते इथं पुष्टी- संदर्भ म्हणून मुद्दाम देत आहे :१. ''मराठी भाषा... बोलीभाषांच्या जिवावरच उभी आहे... पण ते विसरून प्रमाणभाषा स्वयंभू आहे असं... 'ण'... वाल्यांना वाटत आहे! या प्रमाणभाषेलाच... अभिजात मराठी भाषा... मानण्याचा सुप्त डाव... 'ण'... वाल्यांच्या मनात आहे की काय अशी शंका वाटते!...'' - प्रेमानंद गज्वी.२. ''सुदैवानं आपल्याकडं ५० टक्के निरक्षर लोक आहेत, त्यामुळं ५० टक्के मराठीला धोका नाही. निरक्षर लोक आपली भाषा वाचवतील. पण साक्षर व सुशिक्षित सो कॉल्ड विव्दान यांच्यापासून मराठीला धोका आहे.'' - भालचंद्र नेमाडे. ('सर्वधारा', एप्रिल- मे- जून २०२६ च्या नियतकालिकात प्रकाशित झालेला लेख. इतरत्र प्रकाशित करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)


**- डॉ. सुधीर राजाराम देवरे**

**ब्लॉगचा पत्ता :**

**http://sudhirdeore29.blogspot.com/**